जाहीर नोटीस

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, ...

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील **शासकीय वाहन मारुती सुझुकी सियाझ कार क्रमांक एम. एच. ०८ ए.एक्स. ४९४२** या कारचे चार टायर खरेदी करणेचे आहेत.

तरी ज्या कोणा व्यक्ती अगर संस्था यांना वर नमुद प्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील **शासकीय वाहन मारुती सुझुकी सियाझ कार क्रमांक एम. एच. ०८ ए.एक्स. ४९४२ या कारचे MRF** कंपनीचे टायर उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल त्यांनी दरपत्रके खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेपासून आठ दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ११/०७/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. लखोटयावर **'शासकीय वाहन मारुती सुझुकी सियाझ या कारचे चार टायर बाबतचे'** दरपत्रक असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व वस्तूचा दर्जा चांगला असेल असे दरपत्रक असेल त्या दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत आलेले **चार टायर** हे चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. **टायर** खराब निघाल्यास ते नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६. दरपत्रक देणाऱ्या व्यक्तिकडे दुकानाचे लायसन असणे आवश्यक आहे.

७. वरीलप्रमाणे दरपत्रक दाखल करणारी व्यक्ती/संस्था यांनी दरपत्रकात जी.एस.टी. दर नमुद करणे आवश्यक आहे.

८. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहिल.

आज दि. ०४/०७/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

दिनांक– ०४/०७/२०२५



प्र.प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

म.जा.क्र. वित्त/३९२/२०२५
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक– ०४/०७/२०२५

<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दी करिता:–</u>

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे